43 वा
वार्षिक अहवाल
2021-2022
ऑडीट वर्ग-अ

शिक्षण..

सहकार..

समाजसेवा..

अर्थकारणाला
गती देणारा..
समाजाला
प्रगतीपथावर नेणारा..
लोकराजा.!

स्वातंत्र्याचा
अमृतमहोत्सव
वर्ष-२०२२

७५ वर्षे
स्वातंत्र्य उत्सवाच्या
आनंदाची.!



१०० वर्षे
लोकराजाच्या
कृतार्थ स्मृतीची..

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असोसिएशन लि.


1458/ बी, जी.एन. चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर-416 012

E-mail: kopbankasso@gmail.com Website: kopbanksasso.com

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असोसिएशन लि.,कोल्हापूर



श्री. निपुण कोरे
अध्यक्ष



श्री. महेश धर्माधिकारी (सी.ए.)
उपाध्यक्ष



श्री. विजय भोसले
संचालक



श्री.अशोक सौंदत्तीकर
संचालक



श्री. राजेंद्र जाधव
संचालक



श्री. विठ्ठल मोरे
संचालक



श्री. अरुण अलासे
संचालक



श्री. शिरीश कणेरकर
संचालक



श्री. सुर्यकांत पाटील
संचालक



श्री. विलास नाईक
संचालक



श्री. दत्तात्रय थोरावडे
संचालक



श्री. प्रकाश पुजारी
संचालक



सौ. विजया जाधव
संचालिका



सौ. दिपा मिसाळ
संचालिका



श्री. दत्तात्रय राऊत
तज्ञ संचालक



श्री. विश्वास चौगुले
तज्ञ संचालक



श्री. अनिल नागराळे
मुख्य कार्यकारी अधिकारी



श्री. राजाराम कारंडे
उपमुख्य कार्यकारी अधिकारी

# ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन, लि., कोल्हापूर या संस्थेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शुक्रवार दि. ३०/०९/२०२२** रोजी सायंकाळी ४-०० वाजता **सि.स.नं. १४५८/बी वॉर्ड, जी.एन.चेंबर्स, दुसरा मजला, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर-४१६०१२.** येथील असोसिएशनच्या कार्यालयात खालील विषयांवर विचार करणेसाठी आयोजित केलेली आहे. सदर सभेस असोसिएशनच्या सभासद बँकांचे अध्यक्ष यांनी स्वत: अथवा सदर सभेस उपस्थित राहणेबाबत संचालक मंडळाचे ठरावाने अधिकार दिलेल्या संचालक यांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

## • सभेपुढील विषय •

**१) दिनांक २९/०९/२०२१ रोजीच्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.**
**२) सन २०२१ - २२ चा वार्षिक अहवाल स्वीकृत करणे.**
**३) दिनांक ३१/०३/२०२२ रोजीचा लेखापरिक्षीत ताळेबंद व उत्पन्न खर्च पत्रक स्वीकृत करणे.**
**४) सन २०२१-२२ सालात अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास आणि सन २०२२ - २३ सालचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे.**
**५) दिनांक ३१/०३/२०२२ अखेर मिळालेल्या वाढावा विभागणीस मान्यता देणे.**
**६) सन २०२१ - २२ च्या वैधानिक लेखापरिक्षक यांनी दिलेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व त्यावरील संचालक मंडळाने तयार केलेल्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.**
**७) सन २०२२ - २३ सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना निश्चित करणे.**
**८) सन २०२२ - २३ सालच्या असोसिएशनच्या नियोजित शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमास मान्यता देणे.**
**९) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची गैरहजेरी क्षमापित करणेबाबत विचार करणे.**
**१०) मान. अध्यक्षांचे परवानगीने येणारे ऐनवेळच्या विषयावर विचार करणे.**

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून

ठिकाण : कोल्हापूर
दिनांक : १२/०९/२०२२

**अनिल अ. नागराळे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

---

**टिप -** १) सभेच्या ठरलेल्या वेळेस गणपूर्ती न झालेस सभा तहकूब केली जाईल आणि अर्ध्या तासानंतर अशी तहकूब केलेली सभा सभेच्या सूचना पत्रात नमूद केले ठिकाणी घेणेत येईल. सदर सभेत वरील विषयांचा विचार करणेत येईल. अशा सभेला गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही. २) सभासद बँकांनी सभेस उपस्थित राहणाऱ्या पदाधिकारी / संचालक यांची नावे दिनांक २३/०९/२०२२ पर्यंत संचालक मंडळाच्या ठरावासह असोसिएशनकडे पाठवावीत. ३) सभासद बँकांना अहवालावरती सुचना अथवा प्रश्न विचारावयाचे असतील तर त्यांनी लेखी स्वरुपात दि. २३/०९/२०२२ पूर्वी असोसिएशनच्या मुख्य कार्यलयात पोहचतील अशा रितीने पाठवावयाचे आहेत.

### सन २०२१-२०२२ सालाच्या

# ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने

### मा. अध्यक्षांचे मनोगत

**सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

**सर्वांना सस्नेह नमस्कार....**

असोसिएशनच्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संचालक मंडळाच्या वतीने मी आपले सर्वांचे हार्दिक स्वागत करतो, दिनांक ३१/०३/२०२२ रोजी संपलेल्या अहवाल वर्षांचा लेखापरीक्षित ताळेबंद व वार्षिक अहवाल या सभेपुढे ठेवण्यास संचालक मंडळास विशेष आनंद होत आहे.

मागील २ वर्षाच्या काळात जागतिक स्तरावर बरीच उलथापालथ झाली. सर्व सामन्यांच्या वैयक्तिक जीवनातही झाली. प्रत्येकाला याची झळ पोहोचली. यामध्ये बँकिंग क्षेत्रालाही अडचणीमधून व खडतर वाटेने जावे लागले आहे. यामधूनसुद्धा बँकिंग क्षेत्र पुन्हा नव्या उमेदीने कार्यरत झाले आहे.

जगभरात थैमान घालणाऱ्या कोरोना विषाणूला भारताने महत्प्रयासाने काबूत आणले असून सुमारे २०० कोटी लस भारतात दिल्या गेल्या आहेत. याचाच थेट परिणाम भारताच्या अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणण्यात यश आले असून देश विकासाच्या मार्गाकडे जात आहे.

कोरोना काळानंतरसुद्धा बँकिंग व्यवस्था पुर्वपदावर येण्यासाठी काही काळ जावा लागणार असलेने बँकांना ९० दिवसांच्या एन.पी.ए. मध्ये काही सवलत मिळेल अशी आशा होती. परंतु उलट रिझर्व बँक ऑफ इंडिया यांनी एन.पी.ए. ही संकल्पना दैनंदिन पातळीवर (On going) आणून ठेवली आहे. बँकाकडील कॅशक्रेडीट कर्जास अनियमितता हा निकष लागला असल्याने अशा प्रकारच्या कर्जावर बारकाईने लक्ष द्यावे लागणार आहे. तसेच जोपर्यंत एखाद्या कर्जाची संपूर्ण थकबाकी भरल्याखेरीज ते खाते एन.पी.ए. मधून बाहेर येणार नाही, त्यामुळे थकीत कर्जाबाबतीत विशेष दक्षता घ्यावी लागत आहे.

बँकांची एकूण कर्जापैकी ५० टक्के कर्जे ही २५ लाखाच्या आतील असावीत व जुन्या कर्जाची सुद्धा मर्यादा कमी करावी अशी रिझर्व बँक ऑफ इंडियाने आदेश काढल्यामुळे बँकांना याचा त्रास होत आहे.

रिझर्व बँक ऑफ इंडियाने नागरी सहकारी बँकांना रिस्कबेस इंटर्नल ऑडीट ही संकल्पना आणली असून सध्या ती फक्त ५०० कोटींचे वरील डिपॉझीट असणाऱ्या बँकांना सक्तीची केलेली असून नजीकच्या काळात इतर सर्व बँकांना लागू होणार असून त्याचीही खबरदारी बँकांना घ्यावी लागणार आहे.

प्रायोरिटी सेक्टरसाठी कर्जपुरवठ्याबाबत सध्या असणाऱ्या प्रमाणामध्ये टप्याटप्याने वाढ करावयाची असून ती ७५ टक्क्यांपर्यंत वाढवावे लागणार असलेने हा विषयही बँकांनी गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

बी. आर. अॅक्ट मध्ये नवीन सुधारणा केल्यामुळे संचालक यांचा कालावधीबाबत असोसिएशन व फेडरेशनमार्फत बरेच प्रयत्न करूनही रिझर्व बँक ऑफ इंडियाने याबाबत कोणताही बदल केलेला नसून तो कालवधी ८ वर्षाचा आहे तसाच ठेवला असून याबाबतीत सर्व बँकांनी मिळून रिट पिटीशन दाखल करणेबाबत असोसिएशन कार्यालयात लवकरच सर्व सदस्य बँकांचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची बैठक घेण्यात येणार असून पुढील दिशा ठरवून सर्व बँकांनी मिळून / स्वतंत्रपणे रिट पिटीशन दाखल करणेचे निश्चीत केले जाईल.

या वर्षीपासून रिझर्व बँक ऑफ इंडिया डिजिटल करन्सी (आभासी चलन) आणणार आहे. एक समाधानाची बाब

म्हणजे केंद्र सरकारने बँकिंग क्षेत्रास आयकरातून काही प्रमाणात दिलासा दिला आहे.

मान, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी आपल्या असोसिएशनला दिनांक १४ जून २०२२ चे आदेशान्वये नागरी सहकारी बँकांतील नोकरभरतीसाठीच्या पॅनेलमध्ये सभावेश केला असल्यामुळे नागरी सहकारी बँकांना गुणवत्तापूर्ण सेवक वर्ग उपलब्ध होवू शकणार आहेत व अशी बँकांची नोकरभरती ही पारदर्शकपणे असोसिएशनमार्फत पार पाडली जाणार आहे. त्याची प्रत्यक्ष सुरुवातही झाली असून सदस्य बँकांनी याचा लाभ घ्यावा. प्रत्यक्षात काही बँकांची भरती प्रक्रिया सुरु झाली आहे.

गुणवत्तापूर्ण नोकर भरतीसाठी असोसिएशन लवकरच बँकिंग वर आधारित क्रॅश कोर्ससाठी ॲकडमी सुरु करीत असून यामुळे बँकांना गुणवत्तापूर्ण सेवक वर्ग मिळू शकणार आहे.

कोविड १९ महामारीच्या निर्बंधांमध्ये काही प्रमाणात शिथिलता आणल्यामुळे सन २०२१-२२ मध्ये असोसिएशनमार्फत विविध विषयांवर सदस्य बँकांकरीता एकूण २७ प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केल्या होत्या, याला सर्व सदस्य बँकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. त्याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्याबाहेरसुद्धा रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील रत्नागिरी, दापोली, चिपळूण या विभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेणेत आले आहे. चालू वर्षी या प्रशिक्षण कार्यशाळेमुळे १२५० इतके कर्मचारी व पदाधिकारी प्रशिक्षीत केले आहेत.

**सभासद वर्गणी**

अहवाल सालात एकूण ४६ नागरी सहकारी बँका नियमित सभासद आहेत व आपल्या जिल्ह्यात शाखा असणाऱ्या परंतु कोल्हापूर जिल्ह्याबाहेर नोंदणीकृत कार्यालये असणाऱ्या १५ बँका सहयोगी सभासद झालेल्या आहेत. कायदा कलम १०१ वसुली दाखले प्राप्त करणेच्या कमी प्रामुख्याने या सहकारी बँका आपले सभासदत्व स्वीकारत असतात.

सन २०२१-२२ अहवाल वर्षात रु. ३,८०,०००/- इतकी सभासद वर्गणी जमा झालेली आहे.

**गंगाजळी व निधी**

अहवाल वर्षात गंगाजळी व राखीव निधीत रु. २६,४८.८१६.४० ची वाढ होवून असोसिएशनकडे दिनांक ३१ मार्च २०२२ वर्षाखेरीस रु. ४,३९,६१,७४३.५० इतकी गंगाजळी व निधी निर्माण झालेली आहे.

**उत्पन्न व खर्च**

सभासद वर्गणी, गुंतवणूकीवरील व्याज, प्रोसेस फी, दावा खर्च भरपाई शुल्क व प्रशिक्षण फी हे असोसिएशनचे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत आहेत. यामधून अहवाल वर्षात असोसिएशनला रु. ६५.९६,०१२.३८ इतके उत्पन्न मिळाले आहे. अहवाल वर्षात गुंतवणूकीत रु. ३४,००,०००.०० ची वाढ झाली आहे.

कर्मचारी वेतन, मानधन, अधिलाभांश, सानुग्रह अनुदान, स्थानापान्ना भत्ता, प्रशिक्षण आणि घसारा व व्यवस्थापनावर रु. ३५,५९,६०५.१३ इतका खर्च झालेला आहे. वसुली कक्षाकडे माहे ऑगस्ट २०२२ अखेर मा. डॉ. महेश कदम, उपनिबंधक म्हणून कार्यरत होते. त्यांची बदली झालेने त्यांचे जागेवर मा.श्री. बी.के.पाटील माहे सप्टेंबर २०२२ पासून रुजू झाले असून वसुली कक्षाचे कामकाज पूर्वीइतकेच प्रभावशाली सुरु आहे. त्याचप्रमाणे शासन आदेश संकीर्ण १०१७ /प्र.क्र.१०५ / १३स दिनांक ०९/०८/२०२२ पासून प्रोसेस फी मध्ये वाढ करण्यात आली असल्याने मागील वर्षापेक्षा वसुली कक्षाकडील तोटा १४ लाखावरून १.९० लाखापर्यंत आला आहे.

सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा काही बाबींवर जादा खर्च झाला असून त्याचा तपशीलअहवालात दिलेला आहे.

**वाढावा व वाढावा विभागणी -**

दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या अहवाल वर्षांत असोसिएशनच्या व्यवस्थापन व आस्थापनेवर झालेला खर्च आणि कराव्या लागणाऱ्या वैधानिक तरतुदी एकूण उत्पन्नातून वजावट केलेनंतर वर्षाखेरीस रु. ३०,३६,४०७, २५ इतका वाढावा शिल्लक रहात आहे. त्याची विभागणी खालीलप्रमाणे करावी अशी शिफारस संचालक मंडळाने केलेली आहे.

| | |
|---|---|
| राखीव निधी | १४,९१,४०७.२५ |
| इमारत निधी | ४,५०,०००.०० |
| प्रशिक्षण निधी | २,५०,०००.०० |
| पारितोषिक निधी | १,४५,०००.०० |
| प्रशिक्षण केंद्र निधी | १,५०,०००.०० |
| तंत्र विकास निधी | १,५०,०००.०० |
| सुवर्ण महोत्सव निधी | ३,००,०००.०० |
| समारंभ निधी | १,००,०००.०० |
| **एकूण** | **३०,३६,४०७.२५** |

**वैधानिक लेखापरीक्षण -**

सन २०२१-२२ ने वैधानिक लेखापरीक्षण मे. सुनिल नागावकर आणि कंपनी, सनदी लेखापाल कोल्हापूर यांनी पूर्ण केले आहे. त्यांनी असोसिएशनच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करून असोसिएशनला अहवाल वर्षासाठी लेखापरीक्षण वर्ग **'अ'** प्रदान केलेला आहे. त्यांनी दिलेल्या मार्गदर्शक सहकार्याबद्दल असोसिएशन आभारी आहे.

**वसुली कक्ष व दावे आढावा -**

दिनांक २५ ऑगस्ट २०२१ पासून श्री. बाळासाहेब केरबा पाटील, उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा) हे असोसिएशनकडील वसुली कक्षाकडे अर्धवेळ कामकाज पहात असून त्यांचा अनुभव, कामकाज पद्धती, कामाप्रती असणारी निष्ठा लक्षात घेता दाव्यांचे निर्णय लवकरात लवकर होत आहेत. बँकांची व पतसंस्थांची वसुलीची कार्यवाही तत्पर होणेस त्यांची मदत होत आहे. तेव्हा बँकांनी दावा प्रकरणे जास्तीत जास्त दाखल करावीत असे सदस्य बँकांना विनंती करीत आहे.

सन २०२०-२१ मधील दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत १ दावा प्रलंबित आहे. त्या दाव्याची रक्कम रु. ७,९७,५७,३४८/- इतकी आहे.

सन २०२१-२२ अहवाल सालात बँक आणि पतसंस्था यांचे एकूण १६१२ दावे दाखल झाले असून त्याची एकूण रक्कम रुपये १००३८.१७ लाख इतकी आहे. त्यापैकी १४१७ निकाली काढणेत आले असून त्याची रक्कम रुपये ७३६२.७४ लाख इतकी आहे. प्रलंबित राहिलेले एकूण १९५ दाव्यांची रक्कम रुपये २६७५.४३ लाख इतकी आहे.

दिनांक ३१ मार्च २०२२ पूर्वीचे १९५ दावे प्रलंबित होते त्यामध्ये नागरी सहकारी बँकांचे १०४ तर पतसंस्थांचे ९१ दावे एकूण रक्कम रुपये २६७५.४३ लाख प्रलंबित होते. तर सन २०२१ - २२ अहवाल वर्षात सहकारी बँकाकडील ८२१ दावे नवीन दाखल झालेले असून त्याची रक्कम रु. ८१८२.८६ लाख आहे. त्यापैकी ७१७ दाव्याची रक्कम रु. ५८३२.७६ लाख रुपयाची प्रकरणे निकालात काढलेली आहेत. शिल्लक राहिलेले १०४ दाव्यांची रक्कम रु. २३५०.१० लाख इतकी

आहे. तसेच अहवाल सालात पतसंस्थाकडील ७९१ दावे रु. १८५५.३१ लाख दाखल झालेले असून त्यापैकी ७०० दावे रक्कम रु. १५२९.९८ लाखाचे निकालात काढलेले आहेत व ९१ दावे रक्कम रु. ३२५.३२ लाख इतके प्रलंबित आहेत.

**संचालक मंडळ व सेवक वृंद**

अहवाल सालात संचालक मंडळाच्या ६ सभा झालेल्या आहेत. तसेच संचालक मंडळ नियुक्त बँक्स असोसिएशन पारितोषिक माहिती व तंत्रज्ञान सल्ला अधिकारी समूहांच्या बैठका घेणेत आलेल्या आहेत.

पतसंस्था वसुली दावे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग विभागातील बँकांचे तसेच आपल्या जिल्ह्यातील जवळपास १२०० कर्मचारी, अधिकारी यांचे प्रशिक्षण, विविध बँकांच्या परीक्षा यापद्धतीने असोसिएशनचे काम चतुरस्त्र आणि वेगाने वाढत आहे. संचालक मंडळाचे उत्कृष्ट नियोजन आणि कर्मचाऱ्यांची कामसुवृत्ती याचाच हा समन्वय आहे असे म्हणावे लागेल.

अहवाल वर्षाअखेर असोसिएशनकडे मुख्य अधिकाऱ्यांसह पाच सेवक कार्यरत होते. सेवक वर्गाने प्रामाणिकपणे काम करून असोसिएशनच्या कामकाजाला गतिमानता देण्याचा प्रयत्न केला आहे. याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

**सदस्य बँकांची प्रगती**

देशपातळीवर व्यापारी व सरकारी बँकांत आर्थिक घोटाळे घडत असताना असोसिएशनच्या सदस्य बँका आपल्या गुणात्मक प्रगतीमध्ये सातत्य ठेवून आहेत. देशातील अनेक मोठ्या बँका तोट्यात जात असताना सहकारी बँका नफ्यात आहेत. तसेच सहकारी बँकांचा एन.पी.ए. हा व्यापारी व सरकारी बँकांच्या पेक्षा कमी आहे. यावरून आपल्या सदस्य बँका अत्यंत कार्यक्षमपणे कार्यरत व प्रगतीपथावर आहेत हे पुढे दिलेल्या आकडेवारीवरून स्वयंस्पष्ट होत आहे.

**सन २०२१-२२ ची जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची आकडेवारी**

| तपशील | आकडे लाखात |
|---|---|
| वसूलभाग भांडवल व निधी | १,६५,९४९.६२ |
| ठेवी | १२,०२,२०९.७६ |
| कर्जे | ७,३६,१६१.६० |
| गुंतवणूक | ४,९३,५२२.०२ |
| एकत्रित व्यवसाय (कर्जे + ठेवी) | १९,३८,३७१.३६ |
| नक्त नफा (निव्वळ नफा) | ६,९१८.५० |
| शाखा संख्या | ४८१ |
| कर्मचारी संख्या | ३९६७ |
| बहुराज्य बँका (Multi State Bank) | ५ |
| शेड्युल्ड बँका व बहुराज्य | १ |
| शाखारहीत बँका (Unit Banks) | ५ |
| सर्वसाधारण बँका (Licensed) | ४६ |
| नियमित सदस्य बँका | ४६ |
| नाममात्र सदस्य बँका | १५ |

**संकल्प व पूर्ती –**

या अगोदर शासन स्तरावर सहकार मंत्री महोदय नाम. बाळासाहेब पाटील यांचेकडे असोसिएशनच्या वतीने खालील बाबींच्या पूर्ततेसाठी पत्रव्यवहार करून व प्रत्यक्ष दोन ते तीन वेळा त्यांची कराड येथे भेट घेवून पाठपुरावा केला होता.

१) राज्यातील नागरी सहकारी बँकांच्या नोकर भरतीबाबत.

२) नागरी सहकारी बँकांच्या निवडणूक खर्चात असणाऱ्या अडचणीबाबत.

३) नागरी सहकारी बँकांच्या संचालक मिटींग भत्यामध्ये वाढ होणेबाबत.

या तिन्हीं बाबतीत असोसिएशनला यश मिळाले असून नोकरभरती संदर्भात असोसिएशनचा नामतालिकेमध्ये दिनांक १४/०६/ २०२२ रोजीचे आदेशाने समावेश झाला असून याबाबतीमध्ये असोसिएशनने नागरी सहकारी बँकांतील नोकरभरती प्रक्रिया सुरु केली असून त्यामध्ये कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यातील ५ बँकांची नोकरभरती प्रक्रिया सुरु झालेली आहे. तसेच अन्य काही बँकांची नोकरभरती करणेबाबत पत्रव्यवहार झाले आहेत. त्यामध्ये सांगली जिल्ह्यातीलही बँका आहेत. नोकर भरती परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने होत आहे.

त्याचबरोबर निवडणूक खर्चबाबत सध्या काही प्रमाणात यश येवून येणारा निवडणूक खर्च काही प्रमाणात कमी झाला आहे.

संचालक मिटींग भत्ता (बैठक भत्याबाबत) गेली अनेक वर्षे कोणत्याही प्रकारची वाढ झालेली नव्हती. याबाबतचा पाठपुरावा घेतल्यानंतर त्या भत्यामध्ये सध्या वाढ झालेचे परिपत्रक नुकतेच जारी झाले आहे. त्याची लवकरच अंमलबजावणी होईल.

असोसिएशनने बँकेमधील अंतर्गत बढती होणेसाठी त्यांच्या परीक्षा व मुलाखती घेवून सेवकांना बढती देणे संदर्भात प्रयत्न केलेले असून माहे मे / जून / जुलै २०२२ मध्ये १) श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर २) दि कोल्हापूर अर्बन को–ऑप. बँक लि., कोल्हापूर यांच्या सेवकांमधील अंतर्गत बढती प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडली आहे. ही बढती परीक्षा घेणेपूर्वी त्यांचे प्रशिक्षणसुद्धा असोसिएशनने आयोजित केलेले होते.

असोसिएशनने नॅफकब नवी दिल्ली यांचेकडे बी. आर. ॲक्ट मध्ये झालेल्या नवीन जाचक बदलाबाबत पत्रव्यवहार केला आहे.

जिल्हा बाहेरसुद्धा रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., रत्नागिरी या बँकेच्या अधिकारी यांना माहे मार्च २०२२ मध्ये दोन दिवसांचे प्रशिक्षण आयोजित करून प्रशिक्षण दिले आहे.

त्याचप्रमाणे असोसिएशनने लवकरच सहकारी बँकांच्या सेवकांसाठी ॲकॅडमी सुरु करणेचे निश्चीत केले असून त्या कामासही सुरुवात झाली आहे.

जिल्ह्यातील सर्व बँकांतील अधिकारी आणि कर्मचारी पूर्णपणे प्रशिक्षित करण्याचे असोसिएशनचे धोरण लक्षात घेवून सदस्य बँकानी पूर्णपणे सहकार्य करावे अशी विनंती करीत आहोत.

**श्रद्धांजली –**

चालू अहवाल सालात गानसम्राज्ञी लता मंगेशकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, पद्मश्री सिंधूताई सपकाळ, आपल्या असोसिएशनचे माजी मानद मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब इंगवले. तसेच बँकांचे जे ज्ञात / अज्ञात सभासद यांचे निधन झाले त्या सर्वांना असोसिएशनतर्फे श्रद्धांजली अर्पण करून निधन झालेल्या मृत आत्म्यास शांती लाभो.

**अभिनंदन –**

**डॉ. आप्पासाहेब उर्फ सा.रे.पाटील, जयसिंगपूर उदगाव सहकारी बँक लि.** ही बँक मल्टीस्टेट दर्जा प्राप्त केलेबद्दल व **युथ डेव्हलपमेंट को.–ऑप बँक लि.** या बँकेस रिझर्व्ह बँकेने ३५ ए खाली निर्बंध घातले होते, त्या बंधनातून बँकेला बाहेर काढून बँकेस पुनर्जीवन मिळाल्याबद्दल या दोन्ही बँकेचे असोसिएशनतर्फे अभिनंदन !

**सदस्य बँकाची प्रगती व पारितोषिके योजना –**

कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकाचे पालकत्व स्विकारलेली जिल्हास्तरीय शिखर संस्था या नात्याने असोसिएशन आपली जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न करीत आहे. बँकाच्या समस्या सोडविणे बरोबरच त्यांच्या उत्तम कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक करणे हेही आमचे कर्तव्य आहे. या उपक्रमामध्ये सर्व सदस्य बँकांनी सहभाग घेणे अपेक्षित होते. बँकांकडून आलेल्या प्रस्तावांची निष्पक्ष छाननी करुन दि. ३१ मार्च २०२२ वर्षाखेरीच्या उत्तम प्रगतीप्रित्यर्थ सभासद बँकांची सन २०२२ चे पारितोषिकासाठी निवड केलेल्या बँकाची नावे वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये घोषणा करणेत येतील.

**आभार –**

आपल्या असोसिएशनला माजी सहकार मंत्री मा. बाळासाहेब पाटील, मा. श्री. अरुण काकडे, विभागीय सहनिबंधक, मा. डॉ. महेश कदम, उपनिबंधक (परसेवा), मा. श्री. अमर शिंदे, जिल्हा उपनिबंधक, मा. श्री. बाळासाहेब पाटील, सहायक निबंधक, निमशासकीय कार्यालये, सामाजिक संस्था, बँका आणि त्यांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांनी कामकाजात प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष सहकार्य केलेले आहे. असोसिएशनच्या काही सदस्य बँकांनी गरजेवेळी मनुष्यबळ, साधन सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभारी आहोत.

अहवाल वर्षातील कामकाजाचा आढावा आणि दिनांक ३१ मार्च २०२२ अखेरची आर्थिक पत्रके, पुढील वर्षाचे अंदाजपत्रक, मागील अंदाजपत्राकापेक्षा जादा झालेला खर्च, लेखापरीक्षण, दोष दुरुस्ती अहवाल, पुढील वर्षाचा प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादी पत्रके सभेपुढे विचारार्थ सादर केलेली आहेत, त्यास आपण मंजुरी द्यावी अशी विनंती आहे.

दिनांक : १२ / ०९ / २०२२

मा. संचालक मंडळाचे वतीने,

**श्री. निपुणराव कोरे**

अध्यक्ष

# दि. ३१/०३/२०२२ रोजीचा ताळेबंद

| सन २०२०-२०२१ रुपये पैसे | भांडवल व देणी | पोट रक्कम रुपये पैसे | सन २०२१-२०२२ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **भांडवल/निधी** | | ४,३९,६१,७४३.५० |
| १,३२,०२,७१९.९३ | राखीव निधी | १,४२,६१,२२२.३३ | |
| ६५,५०,०००.०० | इमारत निधी | ६८,५०,०००.०० | |
| १०,७५,०००.०० | प्रशिक्षण निधी | १३,७५,०००.०० | |
| १३,६६३.५० | अधिवेशन निधी | १३,६६३.५० | |
| ४,००,०००.०० | सभा समारंभ निधी | ५,००,०००.०० | |
| ३३,३३,६२५.१७ | इमारत घसारा निधी | ३५,७९,९३९.१७ | |
| १,१०,००,०००.३५ | संभाव्य देयता निधी | १,१०,००,०००.३५ | |
| १२,७२,२७२.१५ | तंत्रविकास निधी | १४,२२,२७२.१५ | |
| ६,५०,०००.०० | बँक्स संचालक अभ्यास दौरा निधी | ६,५०,०००.०० | |
| १,४२,६१६.०० | तंत्र विकास निधी युटीलाईज | १,४२,६१६.०० | |
| २,००,०००.०० | नैसर्गिक आपत्ती निधी | २,००,०००.०० | |
| २६,२५,०००.०० | प्रशिक्षण केंद्र निधी | २७,७५,०००.०० | |
| १,००,०००.०० | बँक ठेव संशयीत निधी | १,००,०००.०० | |
| ५,४८,०३०.०० | पारितोषिक निधी | ६,९२,०३०.०० | |
| २,००,०००.०० | सुवर्ण महोत्सव निधी | ४,००,०००.०० | |
| | **देणी** | | ६,३६,९६७.७० |
| ३२,५८२.०० | लेखापरीक्षण फी देणे | ३४,५२०.०० | |
| ०.०० | देणे पाणी बिल | २,२००.०० | |
| १,११,२०७.०० | अधिलाभांश/सानुग्रह अनुदान | १,७१,११७.०० | |
| १,१९,६९०.७० | वसुली विभाग देणे (कॉन्ट्रा) | १,२१,५८४.७० | |
| १,५९०.०० | देणे जीएसटी | ३९,९४६.०० | |
| ०.०० | वार्षिक वर्गणी (कॉन्ट्रा) | ५,०००.०० | |
| २,६२,६००.०० | प्रतिमा संवर्धन | २,६२,६००.०० | |
| २४,०२,५०२.४० | **वाढावा** | | ३०,३६,४०७.२५ |
| ४,४२,४३,०९९.२० | **एकूण** | | ४,७६,३५,११८.४५ |

सदर दिनांकीत अहवालाप्रमाणे

**सीए सुनिल एस. नागांवकर**
सुनिल नागांवकर आणि कंपनी
सनदी लेखापाल, वैधानिक लेखापरिक्षक

श्री. विजय भोसले
श्री. अरुण आलासे
श्री. दत्तात्रय थोरावडे
सौ. दिपा मिसाळ
श्री. अशोक सौंदत्तीकर
श्री. शिरीष कणेरकर
श्री. प्रकाश पुजारी
श्री. दत्तात्रय राऊत
श्री. राजेंद्र जाधव
श्री. सुर्यकांत पाटील
श्री. विश्वास चौगले
श्री. विठ्ठल मोरे
श्री. विलास नाईक
सौ. विजया जाधव

## दि. ३१/०३/२०२२ रोजीचा ताळेबंद

| सन २०२०-२०२१ रुपये पैसे | जिंदगी व येणी | पोट रक्कम रुपये पैसे | सन २०२१-२०२२ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँकेतील शिल्लक** | | २,००,६३६.७५ |
| ०.०० | अ) रोख शिल्लक | ०.०० | |
| २,१९५.०० | ब) सेव्हिंग्ज खाते | १,७५३.६० | |
| १,३६,८२५.५० | क) चालू खाते | १,९८,८८३.१५ | |
| | **गुंतवणूक** | | ४,१६,००,०००.०० |
| ३,८२,००,०००.०० | मुदत ठेवी | ४,१६,००,०००.०० | |
| | **मालमत्ता** | | ३८,९६,३६५.०० |
| २४,६३,१३६.०० | असोसिएशन/वसुली कार्यालय | २४,६३,१३६.०० | |
| १०,०१,५९९.०० | फर्निचर, फिटींग, फिक्चर्स | ९,०१,४३९.०० | |
| १,१८,०५०.०० | इमारत, फिटींग, फिक्चर्स | १,०६,२४५.०० | |
| ४१,२०३.०० | डेडस्टॉक | ६७,०३०.०० | |
| ५,८३०.०० | ग्रंथालय | ५,२४७.०० | |
| १,०३,०८०.०० | इलेक्ट्रिक, फिटींग, फिक्चर्स | ९२,७७२.०० | |
| २,३१,५२४.०० | इलेक्ट्रिकल इक्विपमेंटस् | २,०८,३७२.०० | |
| ७५,०८७.०० | संगणक व प्रिंटर | ५२,१२४.०० | |
| | **इतर येणी** | | १९,३८,११६.७० |
| २४,८८१.०० | टेलीफोन/वीज बयाणा | २४,८८१.०० | |
| १,६००.०० | सिलेंडर व रेग्युलेटर बयाणा | १,६००.०० | |
| ६,१०,२३३.०० | येणे व्याज | ६,४१,६८३.०० | |
| १,१९,६९०.७० | बँक्स असोसिएशन येणे (कॉन्ट्रा) | १,२१,५८४.७० | |
| ५०,०००.०० | आगाऊ प्रोसेस फी भरणा | ०.०० | |
| ०.०० | येणे वार्षिक वर्गणी (नियमित) (कॉन्ट्रा) | ५,०००.०० | |
| ७,५५,४००.०० | येणे सर्व्हिस टॅक्स (अंडर प्रोटेस्ट) | ७,५५,४००.०० | |
| २,१६,६००.०० | येणे इन्कमटॅक्स (अंडर प्रोटेस्ट) | २,१६,६००.०० | |
| ८६,१६५.०० | टी.डी.एस. | १,७१,३६८.०० | |
| ४,४२,४३,०९९.२० | **एकूण** | | ४,७६,३५,११८.४५ |

| | | |
|---|---|---|
| **अनिल अ. नागराळे** | **सी.ए. महेश धर्माधिकारी** | **श्री. निपुणराव कोरे** |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

## नफा-तोटा पत्रक ता. ३१/३/२०२२ अखेर

| सन २०२०-२०२१ रुपये पैसे | उत्पन्न तपशील | रक्कम रुपये पैसे | सन २०२१-२०२२ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ६,२४,५२६.०० | प्रोसेस फी | | १७,४२,८५२.०० |
| २८,७०,९५८.०० | बचत व ठेवीवरील व्याज | | २७,८०,६६६.०० |
| १७,०८,१०१.०० | दावा वसुली खर्च भरपाई | | १२,०८,५८३.०० |
| ३,६५,०००.०० | वार्षिक वर्गणी | | ३,८०,०००.०० |
| १,२०,५५०.०० | प्रशिक्षण वर्गणी | | ४,३८,५३४.०० |
| २५.०० | प्रवेश फी | | २५.०० |
| १०,०००.०० | इतर जमा | | ४०,०००.०० |
| १,२३,५००.०० | याचिका फी | | ०.०० |
| ०.०० | पेपर रद्दी विक्री | | ५,३४९.०० |
| १,१२,५००.०० | नोकरभरती/परीक्षा फी | | ०.०० |
| ०.०० | राउंड ऑफ | | ३.३८ |
| ५९,३५,१६०.०० | एकूण | | ६५,९६,०१२.३८ |

सदर दिनांकीत अहवालाप्रमाणे

**सीए सुनिल एस. नागांवकर**
सुनिल नागांवकर आणि कंपनी
सनदी लेखापाल, वैधानिक लेखापरिक्षक

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. विजय भोसले | श्री. अशोक सौंदत्तीकर | श्री. राजेंद्र जाधव | श्री. विठ्ठल मोरे |
| श्री. अरुण आलासे | श्री. शिरीष कणेरकर | श्री. सुर्यकांत पाटील | श्री. विलास नाईक |
| श्री. दत्तात्रय थोरावडे | श्री. प्रकाश पुजारी | श्री. विश्वास चौगले | सौ. विजया जाधव |
| सौ. दिपा मिसाळ | श्री. दत्तात्रय राऊत | | |

## नफा-तोटा पत्रक ता. ३१/३/२०२२ अखेर

| सन २०२०-२०२१ रुपये पैसे | खर्च तपशील | रक्कम रुपये पैसे | सन २०२१-२०२२ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **पगार व मानधन** | | २४,२३,३८६.०० |
| २३,९३,८७३.०० | पगार | २०,११,०६९.०० | |
| १३,२००.०० | साफसफाई | १३,२००.०० | |
| १,०९,४२१.०० | अधिलाभांश / सानुग्रह अनुदान | १,७१,११७.०० | |
| ०.०० | स्थानापन्न भत्ता | १,७५,०००.०० | |
| ४५,०००.०० | कन्व्हेयंस अलौन्स | ४५,०००.०० | |
| | **टेलीफोन / वीज / पाणी** | | ६७,४४३.०० |
| १७,११६.०० | टेलीफोन बील | २२,२०४.०० | |
| २८,७९०.०० | वीज बील | ३५,२७०.०० | |
| १८,५८९.०० | पाणी बील | ९,९६९.०० | |
| | **कार्यालयीन खर्च** | | १०,६८,७७६.१३ |
| १३,९७०.०० | छपाई | २७,८०९.०० | |
| ५,७३५.०० | सादीलवार | ५,४८१.०० | |
| ५८,२००.०० | कायदा सल्ला फी | ४७,६००.०० | |
| ८४४.०० | पोस्टेज | १,११३.०० | |
| २९,३७६.०० | किरकोळ खर्च | ३१,७०१.०० | |
| ८९,९२७.०० | नोकरभरती/परीक्षा खर्च | ०.०० | |
| ०.०० | समारंभ खर्च | २६,१८६.०० | |
| १३,६१७.०० | प्रवास खर्च | ४,३५४.०० | |
| ७,८४७.०० | वर्तमानपत्रे / मासिके | ८,२०९.०० | |
| ६८०.०० | किरकोळ दुरूस्ती खर्च | ३९,१८०.०० | |
| २१,८२३.०० | महापालिका कर | २१,४५४.०० | |
| २,४१,८५९.०० | चल जिंदगी घसारा | २,५०,३४७.३८ | |
| २,४६,३१४.०० | इमारत घसारा | २,४६,३१४.०० | |
| ३०,०००.०० | लेखापरीक्षण फी | ३०,०००.०० | |
| २१,३७५.०० | मिटींग भत्ता | २४,३७५.०० | |
| ९,०००.०० | वाहन भत्ता | ९,९००.०० | |
| ५,३७८.०० | मिटींग खर्च | १३,४०५.०० | |
| ३,०००.०० | असो. / शिखर संस्था वर्गणी | ३,०००.०० | |
| ७१,४५०.०० | प्रशिक्षण खर्च | २,२७,३५७.०० | |
| २६,२०२.०० | संगणक / सॉफ्टवेअर / मेटेनन्स खर्च | २९,५५०.०० | |
| ०.०० | शिपाई पोषाख | ११,१३५.०० | |
| २,१८४.९० | बँक कमिशन | २,०५६.७५ | |
| २,६०८.०० | विमा | २,६०८.०० | |
| ८८.०० | जीएसटी रिटर्न दंड / व्याज, विलंब फी | ०.०० | |
| ४,३८५.०० | वार्षिक सभा खर्च | ५,६४१.०० | |
| ५.७० | राउंड ऑफ | ०.०० | |
| २४,०२,५०२.४० | **वाढावा** | | ३०,३६,४०७.२५ |
| ५९,३५,१६०.०० | **एकूण** | | ६५,९६,०१२.३८ |

| अनिल अ. नागराळे | सी.ए. महेश धर्माधिकारी | श्री. निपुणराव कोरे |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

## * सन २०२२-२०२३ चे अपेक्षित खर्च *

| तपशिल | २०२१-२२ अपेक्षित खर्च | २०२१-२२ प्रत्यक्ष खर्च | २०२१-२२ जादा खर्च | २०२२-२३ अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| पगार व मानधन | २७,००,०००.०० | २१,९४,०६९.०० | | २७,००,०००.०० |
| साफसफाई | १५,०००.०० | १३,२००.०० | | १५,०००.०० |
| अधिलाभांश / सानुग्रह अनुदान | १,५०,०००.०० | १,७१,११७.०० | २१,११७.०० | २,५०,०००.०० |
| इतर भत्ते | ५०,०००.०० | ४५,०००.०० | | ५०,०००.०० |
| टेलिफोन बिल | २५,०००.०० | २२,२०४.०० | | ३०,०००.०० |
| वीज बिल | ४०,०००.०० | ३५,२७०.०० | | ५०,०००.०० |
| पाणी बिल | २५,०००.०० | ९,९६९.०० | | २५,०००.०० |
| छपाई | ५०,०००.०० | २७,८०९.०० | | १,००,०००.०० |
| सादिलवार | १५,०००.०० | ५,४८१.०० | | ३०,०००.०० |
| कायदा सल्ला फी | १,००,०००.०० | ४७,६००.०० | | १,२५,०००.०० |
| पोस्टेज खर्च | २०,०००.०० | १,११३.०० | | .२०,०००.०० |
| किरकोळ खर्च | ५०,०००.०० | ३१,७०१.०० | | ५०,०००.०० |
| प्रवास खर्च | २०,०००.०० | ४,३५४.०० | | २०,०००.०० |
| वर्तमानपत्रे / मासिके | १५,०००.०० | ८,२०९.०० | | १५,०००.०० |
| इमारत व किरकोळ दुरुस्ती | ६०,०००.०० | ३९,१८०.०० | | ७५,०००.०० |
| महानगरपालिका कर | २५,०००.०० | २१,४५४.०० | | २५,०००.०० |
| जिंदगी घसारा व इमारत घसारा | ६,००,०००.०० | ४,९६,६६१.३८ | | ५,००,०००.०० |
| लेखापरीक्षण फी | ३०,०००.०० | ३०,०००.०० | | ३०,०००.०० |
| बँक कमिशन | ५,०००.०० | २,०५६.७५ | | ५,०००.०० |
| मिटींग भत्ता | ७५,०००.०० | २४,३७५.०० | | ७५,०००.०० |
| वाहन भत्ता | २५,०००.०० | ९,९००.०० | | २५,०००.०० |
| मिटींग खर्च | ४०,०००.०० | १३,४०५.०० | | ४०,०००.०० |
| विमा | ५,०००.०० | २,६०८.०० | | ५,०००.०० |
| शिखर संस्था वर्गणी | २५,०००.०० | ३,०००.०० | | ३,०००.०० |
| डेडस्टॉक निर्लेखन | १०,०००.०० | ०.०० | | ०.०० |
| परीसंवाद व परिषद | २५,०००.०० | ०.०० | | २५,०००.०० |
| समारंभ खर्च | ३५,०००.०० | २९,५५०.०० | | ४०,०००.०० |
| जाहिरात | २५,०००.०० | ०.०० | | १,००,०००.०० |
| प्रशिक्षण कार्यशाळा | ३,५०,०००.०० | २,२७,३५७.०० | | ४,००,०००.०० |
| शिपाई पोषाख | १५,०००.०० | ११,१३५.०० | | १५,०००.०० |
| जीएसटी रिटर्न | ५,०००.०० | ०.०० | | ०.०० |
| याचिका खर्च | ५०,०००.०० | ०.०० | | ५०,०००.०० |
| वार्षिक सभा खर्च | १५,०००.०० | ५,६४१.०० | | १५,०००.०० |

## * सन २०२२-२०२३ चे अपेक्षित उत्पन्न *

| उत्पन्न तपशिल | २०२१-२२ अंदाजपत्रकीय उत्पन्न | २०२१-२२ प्रत्यक्ष उत्पन्न | २०२२-२३ अपेक्षित उत्पन्न |
|---|---|---|---|
| बचत व ठेवीवरील व्याज | २८,००,०००.०० | २७,८०,६६६.०० | २८,००,०००.०० |
| दावा वसुली भरपाई व प्रोसेस फी | २३,५०,०००.०० | २९,५१,४३५.०० | ३०,००,०००.०० |
| वार्षिक वर्गणी | ३,५०,०००.०० | ३,८०,०००.०० | ३,५०,०००.०० |
| प्रशिक्षण वर्गणी | २,००,०००.०० | ४,३८,५३४.०० | ४,००,०००.०० |
| इतर जमा | २०,०००.०० | ४०,०००.०० | २०,०००.०० |
| **एकूण** | **५७,२०,000.00** | **६५,९०,६३५.00** | **६५,७०,000.00** |

# वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल

प्रति,

**मा. चेअरमन / सेक्रेटरी / मुख्य कार्यकारी अधिकारी**

**कोल्हापूर जिल्हा सहकारी बँक्स सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर**

**संदर्भ :** नेमणुक पत्र संदर्भ क्रमांक दिनांक वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २९/०९/२०२१ ठराव क्रमांक ७ नुसार

**आर्थिक पत्रकावरील वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल**

१) आम्ही कोल्हापूर जिल्हा बँक्स सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर या संस्थेच्या दि. ३१ मार्च २०२२ रोजीच्या आर्थिक पत्रकाचे म्हणजेच दि. ३१ मार्च २०२२ रोजीच्या ताळेबंदाचे, त्या सोबत जोडलेल्या त्या दिवशी संपणाऱ्या वर्षाच्या नफातोटा पत्रकाचे, त्यासोबत जोडलेल्या हिशेबांच्या धोरणांचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचे कि जे संस्थेच्या शाखांसह आर्थिक पत्रकाचा भाग आहेत यांचे दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३१/०३/२०२२ या कालावधीचे लेखापरिक्षण केलेले आहे.

**व्यवस्थापनाची आर्थिक विवरण पत्रकाबाबतची जबाबदारी**

२) महाराष्ट्र सहकारी संस्था आधनियम १९६० आणि त्या खाली बनविलेले नियम या अन्वये आर्थिक पत्रक तयार करण्याची जबाबदारी ही संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. सदर जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अपहार किंवा चुक यामुळे होणाऱ्या लक्षणीय चुकांपासून मुक्त राहील अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे आणि ते अंमलात आणणे याचा समावेश असेल.

**लेखापरिक्षकाची जबाबदारी**

३) आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाचे आधारे सदर आर्थिक पत्रकांबाबतचे मत व्यक्त करण्याची आहे. भारतीय सनदी लेखापाल संस्था (आय. सी. ए. आय.) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाद्वारे निर्देशित केलेल्या मापदंडानुसार आम्ही आमचे लेखापरिक्षण केलेले आहे. त्या मापदंडानुसार लेखापरिक्षणाचे नियोजन व कार्य असे असावे कि ज्या योगे या हिशोबात लक्षणीय चुका नाहीत याची सर्वसाधारण अशी खात्री होईल.

४) लेखापरिक्षणामध्ये आर्थिक पत्रकामध्ये दाखविलेल्या रकमा व केलेली विधाने याबाबतचे योग्य पुरावे मिळविणे व त्यांची तपासणी करणे यांचा अंतर्भाव असतो. लेखापरिक्षकांनी अंमलात आणलेली कार्यपद्धती ही लेखापरिक्षकाचे स्वत:चे अंदाज, तसेच आर्थिक पत्रकांमधील दप्तरी चुक अथवा अपहार अशी कोणतीही महत्त्वाची अनियमीतता यामुळे निर्माण होणारे धोके यांचे मूल्यमापन करणारी आहे. या जोखमीची पडताळणी करताना लेखापरिक्षकाने संस्थेच्या आर्थिक पत्रके तयार करण्याच्या व सादर करण्याच्या अंतर्गत नियंत्रणाबाबत विचार करून लेखापरिक्षण कार्याची त्या परिस्थितीतील कार्यपध्दती ठरविली पाहिजे. लेखापरिक्षणामध्ये जी हिशेबाची धोरणे अंमलात आणली आहेत ती पडताळणे, व्यवस्थापनाने जे महत्त्वपूर्ण अंदाज केले आहेत त्या बाबत योग्य निष्कर्ष काढणे तसेच सर्वसाधारणपणे आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे मुल्यमापन करणे याचा समावेश होतो.

५) लेखापरिक्षण कार्यातून मिळालेला पुरावा हा आमच्या लेखापरिक्षणाच्या मतास पुरकता देत असल्याबाबतची आम्हास खात्री झाली आहे.

**लेखापरिक्षकाचे मत**

६) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत.

आमच्या माहितीप्रमाणे तसेच आम्हास देण्यात आलेल्या खुलाशावरून हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व अन्य लागू कायदे तसेच निबंधकांनी वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रकान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात आणि भारतात सर्वमान्य असणाऱ्या या जमाखर्चाच्या तत्वाप्रमाणे संस्थेची सत्य व रास्त परिस्थिती दर्शवितात.

(अ) ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/०३/२०२२ च्या संस्थेच्या परिस्थितीची

(ब) नफा तोटा पत्रकाच्या बाबतीत दि. ३१/०३/२०२२ संपणाऱ्या वर्षाच्या नफ्याची/तोट्याची आमच्या सोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवाल भाग अ, ब व क मधील केलेल्या अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहेत.

**इतर कायदेशीर व नियामक बाबतीतील अहवाल**

७) ताळेबंद व नफातोटा पत्रक हे महाराष्ट्र सहकारी संस्थाअधिनियमातील तरतूदीनुसार तयार करण्यात आलेली आहेत.

८) आम्ही अहवाल करतो कि,

(अ) लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे आम्हास जरुर ती सर्व माहिती आणि खुलासे उपलब्ध झाले आहेत आणि ते समाधानकारक आहेत.

(ब) आमच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्याप्रमाणे संस्थेचे आम्ही तपासलेले सर्व व्यवहार संस्था अधिकाराच्या मर्यादितच केलेले आहेत.

(क) आमच्या लेखापरिक्षण कार्यास आवश्यक असणारी विवरणपत्रके संस्था कार्यालय व संस्थेच्या शाखांनी सादर केली असून ती योग्य व परिपूर्ण आहेत.

९) आमच्या मते सोबत जोडलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रक हा लागु असणाऱ्या लेखांकन मानकाप्रमाणे (एस.एस.१,१५,२२,२८ वगळून) तयार करणेत आला आहे.

१०) तसेच आम्ही अहवाल करतो की,

(अ) अहवालासोबत जोडलेला संस्थेचा ताळेबंद व नफातोटा पत्रक संस्थेच्या हिशेबांच्या पुस्तकांशी व विवरणांशी जुळत आहे.

(ब) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने कायद्यानुसार आवश्यक व योग्य ती हिशेबाची सर्व पुस्तके ठेवली आहेत.

(क) संस्थेच्या लेखापरिक्षण अहवाल तयार करताना शाखांच्या स्वतंत्र लेखापरिक्षकांनी केलेल्या लेखापरिक्षण अहवालाचा विचार करणेत आला आहे.

(ड) सहकारी वर्ष सन २०२१/२०२२ करीता संस्थेस लेखापरिक्षण वर्ग ''अ'' देणेत आला आहे.

**स्थळ :- कोल्हापूर**

**अहवाल दिनांक :- ३०/०७/२०२२**

सही :-

लेखापरिक्षकाचे नांव : **सुनिल एस. नागांवकर**

पदनाम : **चार्टर्ड अकौंटंट**

मेंबरशिप नंबर : **१०५२६१**

फर्म रजिस्ट्रेशन नंबर : **११८३९७ डब्ल्यु**

ऑडिट पॅनेल नंबर : **१००५९**

UDIN : **22105261AOCBNS2444**

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर

## * सन २०२१-२०२२ सालची सदस्य बँकांची सांख्यकीय माहिती *

(आकडे लाखात)

| अ. नं. | बँकेचे नाव | लेखा परीक्षण वर्ग | वसूल भाग भांडवल | एकूण निधी | ठेवी | नफा / तोटा | एकूण गुंतवणूक | कर्ज | खेळते भांडवल | एकूण सभासद | मुख्या लया सह शाखा | एकूण सेवक वर्ग | ढोबळ एनपीए ०% | निव्वळ एनपीए ०% | सी.आर.ए. आर. % | सी.डी. रेशो % | एटीएम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि; रेंदाळ | ब | ४२६.७८ | ७४८.४६ | १०५२४.७४ | -९.०८ | ४६०१.३७ | ६१६९.०१ | १२०२१.९१ | ९११५ | ९ | ५४ | - | ६.१९ | १५.३३ | ५८.६१ | आहे |
| २ | ॲड. शामरावजी शिंदे सत्यशोधक सहकारी बँक लि; कोल्हापूर | अ | २४०.६३ | ४१०.१० | ४१२२.२९ | ४७.९९ | २२४९.६७ | २२७८.५६ | ४९८९.६६ | ८३१६ | ४ | २७ | ६.३५ | ०.८७ | २१.३८ | ५५.२७ | नाही |
| ३ | अमन सहकारी बँक लि; इचलकरंजी | अ | १९६.१५ | ११९०.६० | ४४२०.९१ | ३५.२६ | १८४५.२८ | ३०९०.३९ | ६००३.४६ | ४५६२ | ४ | २५ | ८.२२ | ३.९६ | ३८.७४ | ६९.९० | आहे |
| ४ | बिरदेव सहकारी बँक लि; इचलकरंजी | अ | ८२.४४ | ३३२.०४ | १६८५.१३ | २२.१७ | ९५५.५३ | ९०६.२० | २१७९.२१ | २६६८ | १ | ६ | ०.०० | ०.०० | ३३.६९ | ५३.७८ | नाही |
| ५ | डी. वाय. पाटील सहकारी बँक लि; कोल्हापूर | अ | ६४.९८ | ५२५.३३ | ४४९४.६४ | ५७.५० | १९४७.१८ | २६२१.७३ | ५३३४.७८ | २७३० | ३ | १७ | ५.५३ | ०.०० | १७.०१ | ५८.३३ | नाही |
| ६ | डॉ. आण्णासाहेब चौगुले अर्बन को-ऑप. बँक लि; पेठवडगाव | अ | १९४.६३ | १४९२.८८ | १२०४०.३९ | १४७.९५ | ४९९७.८३ | ७१८८.५३ | १४३७७.८१ | १७९४० | १५ | ८७ | ५.७७ | ०.०० | १७.०३ | ५९.७० | आहे |
| ७ | डॉ. आप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील जयसिंगपूर उदगाव सहकारी बँक लि; जयसिंगपूर | अ | ९४५.३५ | २१०४.३८ | ३६६४५.३९ | १८९.८४ | २१२२६.४० | १६३६६.४३ | ४०४३२.२३ | १३८४२ | १५ | १०६ | ५.०२ | १.२९ | १५.४८ | ४५.०० | आहे |
| ८ | जनता सहकारी बँक लि; आजरा | अ | ११३१.१२ | २३६४.८० | २७७९४.८४ | १७१.७१ | १२२९०.६८ | १८००३.५१ | ३२३२४.७८ | २८१४२ | १५ | ९० | ५.०८ | ०.३३ | १४.३४ | ६४.७७ | आहे |
| ९ | जिव्हाजी सहकारी बँक लि; इचलकरंजी | अ | १८४.३५ | ४३६.५३ | ४८२६.३६ | ४२.२३ | २७४२.८६ | २४०९.२२ | ५५८१.५१ | ५११० | ३ | २२ | ४.१८ | १.४९ | २०.२३ | ५१.३२ | नाही |
| १० | जवाहर सहकारी बँक लि; हुपरी | अ | २७६.३९ | ७८९.६३ | १३५२१.०३ | ६६.३३ | ६५१०.०० | ७०५०.७७ | २०५७१.८० | ६२५२ | ७ | ४८ | ७.८८ | १.८० | १२.२४ | ५२.१५ | आहे |
| ११ | कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि; इचलकरंजी | अ | ६३०७.६९ | १९५८५.३४ | २२९०४२.६० | ११६२.२६ | ४७६७७.५९ | १४९७३२.०९ | २८८०३८.०७ | ७०२५१ | ४५ | ५३१ | ९.२७ | ५.१६ | १३.८८ | ६५.३७ | आहे |
| १२ | कोहिनूर सहकारी बँक लि; इचलकरंजी | अ | ९८.८१ | ३१४.५६ | २४६४.४७ | २५.०९ | ११५३.४३ | १४९५.५० | ३०००.६९ | ३८२२ | ३ | १८ | ११.०१ | ५.९८ | २५.५३ | ६०.६८ | नाही |
| १३ | कोल्हापूर महिला सहकारी बँक लि; कोल्हापूर | अ | ४१८.६९ | १०४४.२७ | ९५१८.६३ | ६२.१६ | ५२९५.७७ | ५१६४.९५ | ११२८९.४४ | १२१६६ | ८ | ५२ | १२.४६ | २.८२ | १८.३४ | ५४.२६ | नाही |
| १४ | कुंभी कासारी सहकारी बँक लि; कुडित्रे | अ | ३१८.८९ | १२५३.४८ | ९११७.०४ | १०४.४२ | ४९७७.९० | ६०६०.५८ | १२३६७.३६ | १२८४६ | ७ | ४७ | ७.६२ | ०.०० | १७.३६ | ६१.११ | आहे |
| १५ | लक्ष्मी विष्णू सहकारी बँक लि; इचलकरंजी | अ | ४३८.४५ | २२८.९२ | ३६०७.३४ | ७.९५ | ९७३.६६ | २८८२.०३ | ४४४१.९१ | ३४९१ | १ | ४ | ७.९५ | ४.८७ | २१.९२ | ७९.०० | नाही |
| १६ | नांदणी सहकारी बँक लि; नांदणी | अ | ८९१.७० | १५४६.०२ | २४३२४.५४ | २०२.९४ | १०४९७.२० | १४४६०.६१ | २७८२३.८१ | ९७५५ | ८ | ७३ | ३.६६ | ०.०० | १३.४२ | ५९.४५ | आहे |
| १७ | पार्श्वनाथ को-ऑप. बँक लि; कोल्हापूर | अ | ८३७.९८ | १९५२.०१ | १८८०९.०७ | ५३.१८ | ६२२१.३६ | १२६२० १० | २१२६१.१४ | १००८४ | १२ | ९८ | ११.९६ | ६.२८ | १५.४३ | ६७.१० | आहे |
| १८ | राजर्षी शाहू गव्हर्मेंट सर्व्हंटस् को-ऑप. बँक लि; कोल्हापूर | अ | १८०६.८६ | २४५८.२९ | १७९४४.२२ | १८१.७० | ८३९५.८९ | १२४८९.०४ | २२९०३.३४ | २११३२ | १४ | ८३ | १.९५ | ०.०० | २१.७६ | ६९.६० | आहे |
| १९ | राजे विक्रमसिंह घाटगे को-ऑप. बँक लि; कागल | अ | ४६७.८५ | ३८३५.६३ | ४३७२१.०१ | २५७.९९ | २०१९८.२६ | २४१९४.३५ | ४९५७३.५९ | १४७५१ | ९ | १२३ | ४.३९ | ०.०० | १२.७१ | ५५.३४ | आहे |
| २० | श्री महालक्ष्मी को-ऑप. बँक लि; कोल्हापूर | अ | १८१४.०९ | ९८७८.३६ | ६२४९६.७० | ५६३.८३ | ३८०१७.३९ | ३०९०३.९२ | ७३४११.८६ | २४४५८ | १२ | ८५ | १४.४४ | १.२८ | २०.२७ | ४९.४६ | आहे |
| २१ | श्री भरत अर्बन को-ऑप. बँक लि; जयसिंगपूर | अ | ५९१.४८ | १५६१.५० | २०१९४.४३ | १०६.४१ | ९२००.६४ | ११७७७.०४ | २२९६६.४६ | २८४१० | ७ | ८३ | ६.९२ | ०.१७ | १२.७६ | ५८.३२ | आहे |
| २२ | श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि; हुपरी | अ | १६९.०० | १५७५.०० | ११९४०.०० | ८६.९८ | ६२१२.०० | ७१७५.०० | १५२०८.०० | ६७२७ | ११ | ६० | ३.४१ | ०.०० | १२.९४ | ६१.४४ | नाही |
| २३ | श्री पंचगंगा नागरी सहकारी बँक लि; कोल्हापूर | अ | ९४४.०५ | ३५३० १२ | २७६१५.७० | ३१७.०० | १३५४५.९८ | १६७५८.९१ | ३३११२.६७ | १८००६ | ५ | ८१ | ६.२९ | ०.०० | २२.७२ | ६०.६८ | आहे |

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर

## * सन २०२१-२०२२ सालची सदस्य बँकांची सांख्यकीय माहिती *

(आकडे लाखात)

| अ. नं. | बँकेचे नाव | लेखा परीक्षण वर्ग | वसूल भाग भांडवल | एकूण निधी | ठेवी | नफा / तोटा | एकूण गुंतवणूक | कर्ज | खेळते भांडवल | एकूण सभासद | मुख्या लया सह शाखा | एकूण सेवक वर्ग | ढोबळ एनपीए ०% | निव्वळ एनपीए ०% | सी.आर.ए.आर. % | सी.डी. रेशो % | एटीएम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | श्री नृसिंह सरस्वती सहकारी बँक लि; आसुर्ले पोर्ले | अ | ६६.०१ | १०४.३१ | ८७३.५० | १२.०९ | २५०.७८ | ६६३.१७ | ११६०.६३ | २१६३ | १ | ५ | ६.७९ | ०.०० | २३.०० | ६७.३२ | नाही |
| २५ | श्री आदिनाथ को-ऑप. बँक लि; इचलकरंजी | अ | ५६९.२७ | ११४३.३४ | १३००७.६३ | १०१.२० | ५३०६.३५ | ८०६५.०० | १५६२६.८९ | ७६२० | ७ | ५७ | ५.९१ | ०.०० | १६.४६ | ६२.०० | आहे |
| २६ | श्री यशवंत सहकारी बँक मर्यादित; कुडित्रे | अ | ५४८.४० | १३९२.७४ | १४००७.४७ | १४१.७६ | ५४०२.९४ | ९८७३.१७ | १७१५०.७९ | १९३०४ | ११ | ७२ | ४.९९ | ०.०० | १४.०८ | ७०.४९ | आहे |
| २७ | श्री वीरशैव को-ऑप. बँक लि; कोल्हापूर | अ | २१८३.०० | ११७७६.०० | १०५५२२.०० | ७७५.०० | ४५३७२.०० | ६६७२१.०० | १२१२२५.०० | २५९८३ | ३१ | २८६ | ५.५७ | ०.०० | १३.२९ | ६३.२२ | आहे |
| २८ | श्री वारणा सहकारी बँक लि; वारणानगर | अ | ३५८८.६९ | ७७८८.२९ | ९८९१२.३६ | ४७६.३४ | ३७१०४.९९ | ६२८२८.४९ | ११२२९४.३४ | २५९०८ | ४१ | ३५४ | ७.६२ | ३.५१ | १२.४१ | ६३.५२ | आहे |
| २९ | श्रीपतरावदादा सहकारी बँक लि; कोल्हापूर | अ | २७५.३७ | १०२३.०९ | ८४८१.८१ | ४५.४१ | ३५३२.१९ | ५६०३.३२ | १०३२८.०३ | ५०८५ | ८ | ४५ | ६.५८ | ०.०० | १८.०२ | ६६.०६ | नाही |
| ३० | सन्मती सहकारी बँक लि; इचलकरंजी | अ | ७६१.४४ | २३७६.५१ | ३२६२९.१३ | १२४.७४ | ९३४१.३८ | १९८०२.१९ | ३६७८०.५४ | १३३५२ | १३ | १२४ | ८.५५ | ५.५६ | १३.०७ | ६०.६९ | आहे |
| ३१ | स्वातंत्र्यसेनानी कै. श्रीपाल आलासे (काका) कुरुंदवाड अर्बन को-ऑप. बँक लि; कुरुंदवाड | अ | १०१७.६७ | २१५४.२४ | २७६७९.३९ | २०८.७६ | १२४७३.३४ | १५५००.८६ | ३१५९९.७४ | २५००० | १८ | ९१ | ४.०७ | ०.४९ | १४.८५ | ५६.०० | आहे |
| ३२ | शंकरराव पुजारी नूतन सहकारी बँक लि; इचलकरंजी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३३ | दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि; कोल्हापूर | अ | १९९५.९१ | १६२०८.०४ | ७९९१४.८६ | ५५४.८९ | ४८४२४.९२ | ४५३९८.८६ | १०४६०२.१४ | ३२८४७ | १९ | १८६ | १९.४६ | ५.९४ | २१.३८ | ५६.८१ | आहे |
| ३४ | दि आजरा अर्बन को-ऑप. बँक लि; आजरा | अ | १७३३.०० | ९६०७.०० | ७२०७६.०० | ४६३.०० | ३४१५२.०० | ४४१८७.०० | ८६५०६.०० | ३६०९७ | ३३ | ३६२ | ७.०० | ०.०० | १९.०८ | ६१.३१ | आहे |
| ३५ | दि इचलकरंजी मर्चंट्स को-ऑप. बँक लि; इचलकरंजी | अ | ३६७.८० | ८८२.५० | १२३४७.२४ | ८९.०३ | ५५७३.१३ | ६७०९.०४ | १४३२०.६१ | ५६८४ | ७ | ५६ | ९.६३ | ४.७५ | १५.४५ | ५४.३४ | आहे |
| ३६ | दि कमर्शिअल को-ऑप. बँक लि; कोल्हापूर | अ | ९९९.५१ | ४२५७.९९ | २८७७४.८६ | २५७.९८ | १६४३५.६४ | १५९३९.७७ | ३५४०१.१८ | १८९१२ | ७ | ८१ | ८.९६ | ०.०० | २१.६१ | ५५.३९ | आहे |
| ३७ | दि गडहिंग्लज अर्बन को-ऑप. बँक लि; गडहिंग्लज | क | ४७२.५१ | ३६०७.३१ | १७०३६.०५ | -७६०.८३ | ५४६८.३० | १३३६०.०८ | २२९२३.८५ | १०३८० | ८ | ६५ | २० १८ | १५.६६ | ७.८२ | ७८.४२ | आहे |
| ३८ | दि गणेश सहकारी बँक लि; कुरुंदवाड | अ | ६६.२४ | २५९.४४ | २४७४.७७ | २८.४४ | १२०६.५८ | १५२५.२६ | २९७४.०६ | २१६० | १ | ७ | ३.७९ | ०.०० | १३.२० | ६१.६२ | नाही |
| ३९ | दि चंदगड अर्बन को-ऑप. बँक लि; चंदगड | ब | ४४३.१७ | ५३० ५३ | ७९३६.१३ | ५५.५२ | २१४९.०२ | ५५८१.७८ | ९१९२.१६ | १०१२३ | ६ | ३४ | ९.५४ | ५.८८ | १३.७६ | ६५.५९ | नाही |
| ४० | दि प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि; कोल्हापूर | अ | २६२४.०६ | १३२७.५१ | ३६९७२.७४ | २३८.३४ | ११४५५.७६ | २६९७९.०२ | ४२२५०.२७ | ६७९५ | १२ | ११० | २.४९ | १.२९ | १३.८२ | ६८.६३ | आहे |
| ४१ | दि व्यंकटेश्वरा सहकारी बँक लि; इचलकरंजी | अ | २१७.३३ | ६६१.९३ | ८५७२.४८ | ३० ११ | ४०२९.८१ | ४८६०.८१ | ९५७५.२८ | ३७४० | ४ | २६ | ५.२५ | ३.८५ | २०.६० | ५६.७० | नाही |
| ४२ | दि कोडोली अर्बन को-ऑप. बँक लि; कोडोली | अ | २४८.६० | ६५९.५८ | ६५२५.८० | ६८.६१ | २१३५.५६ | ३९५२.३१ | ८१८१.६२ | ३३९१४ | ९ | ४८ | ५.६२ | ०.०० | १८.३३ | ६० ५६ | आहे |
| ४३ | दि प्रियदर्शनी महिला सहकारी बँक लि; गडहिंग्लज | ब | ५३.७८ | ९०.०१ | ९५३.८४ | ५.५३ | २२९.९१ | ७११.२९ | ११६८.८२ | २५५७ | १ | ८ | ७.७८ | ३.६५ | १८.१८ | ६७.३१ | नाही |
| ४४ | विश्वनाथराव पाटील मुरगूड सहकारी बँक लि; मुरगूड | अ | २०१.२२ | ४८८.६५ | ६६०८.१७ | ४४.३४ | २७७८.६६ | ४२६६.६७ | ७५६९.०८ | ५२१७ | ६ | ३० | ३.९१ | ०.०० | १६.१३ | ६४.५७ | नाही |
| ४५ | यड्राव को-ऑप. बँक लि; यड्राव | अ | १९६.५७ | ६४७.३२ | १३८३६.०८ | २७.७१ | ५६३१.६१ | ८२७३.७७ | १५०७५.३२ | ६४४२ | ६ | ३३ | ३.०८ | ०.८१ | १३.३५ | ५९.८० | नाही |
| ४६ | युथ डेव्हलपमेंट को-ऑप. बँक लि; कोल्हापूर | ब | ६७४.८९ | १६५२.२४ | ५३९५.९८ | २६.७२ | ३२५३.२८ | २७६०.२७ | ९३२९.०९ | १८१४८ | १४ | ६७ | १९.८१ | ०.०० | १५.४७ | ५१.१५ | आहे |
| | एकूण | | ३८१५२.८० | १२७७९६.८२ | १२०२२०९.७६ | ६११८.५० | ४९३५२२.०२ | ७३६१६१.६० | १४४४४५०.९३ | ६५२१६७ | ४८१ | ३९६७ | | | | | |

**Compliance function and role of Chief Compliance Officer (CCO) अर्थात अनुपालन कार्य आणि मुख्य अनुपालन अधिकाऱ्यांची (अपेक्षित) भूमिका**

भारतीय रिझर्व्ह बँकेने १९ सप्टेंबर २०२२ रोजी टियर ३ आणि ४ सहकारी बँकांकरता परिपत्रक जारी केले आहे. ज्याच्या अनुषंगाने नियामकाची सहकारी बँकांकडून 'अनुपालन कार्य आणि मुख्य अनुपालन अधिकारी' याबाबत असणारी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. हे परिपत्रक टियर १ आणि २ मध्ये असणाऱ्या बँका आणि सर्व समावेशक निर्देशांतर्गत असणाऱ्या बँका यांना लागू नसेल. या नवीन मार्गदर्शक तरतुदी सहकारी बँकांमधील अंतर्गत अनुपालन कार्यरचना पद्धतीबाबत पथदर्शक स्वरूपाच्या आहेत. सहकारी बँकांच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी सकारात्मक प्रभाव पाडणाऱ्या आहेत.

**अनुपालन कार्य – अर्थ आणि सकारात्मक दृष्टीकोन**

अनुपालन कार्य याचा सर्वसामान्य भाषेतील अर्थ म्हणजे स्वयंनियमन आणि स्वयंशिस्त याचा संयोग! हा संयोग साधताना सहकारी बँकांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर बँकेच्या अनुपालनाबाबत आणि नियमकाच्या अपेक्षापूर्तीमधील कमतरतेबाबत असणारी जोखीम नुम्यतम पातळीवरती आणण्याकरता सहाय्यभूत ठरेल यात शंका नाही.

**अनुपालन कार्यप्रणाली अनुसरण्यासाठीची कालमर्यादा**

टियर ३ आणि ४ सहकारी बँकांनी अनुक्रमे १ ऑक्टोबर २०२३ आणि १ एप्रिल २०२३ पर्यंत ही कार्यप्रणाली अनुसरणे अपेक्षित आहे. या कालमर्यादेमध्ये कार्यप्रणाली अनुसरणे तसेच संचालक मंडळाने यासंदर्भातील धोरण मंजूर करणे आणि मुख्य अनुपालन अधिकाऱ्यांची नेमणूक करणे सुद्धा अपेक्षित आहे.

**अनुपालन कार्यप्रणाली अनुसरण्यासाठीचा सूचक दृष्टीकोन**

सहकारी बँकांमधील वरिष्ठ व्यवस्थापनाने तसेच संचालक मंडळाने अनुपालन कार्यप्रणाली पद्धतीबद्दल सर्वसमावेशक दृष्टिकोन बाळगणे गरजेचे आहे. या कार्यप्रणालीमधील मूळ गाभा हा बँकेला संस्थात्मक पातळीवरील असणारे कायदे, नियम यांचे तसेच बँकेच्या नानाविध कार्य करताना अनावधानाने तसेच काही बाबत अज्ञानामुळे अनुपालन उल्लंघनाबाबतची जोखीम अवगत करून घेणे आणि त्यासंदर्भात धोरणात्मक उपाय योजना करणे हा आहे. यासंदर्भात काही मुख्य टप्पे खालील प्रमाणे:

१. बँकेचे वरिष्ट व्यवस्थापनातील अधिकारी वर्ग तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संचालक मंडळ यांनी एकमेकांच्या समन्वयाने या परिपत्रकात अपेक्षित असणाऱ्या तसेच बँकेस लागू होणाऱ्या बाबींबद्दल सखोल आणि विस्तृत चर्चा करून आपल्या संस्थेस असणाऱ्या अनुपालनाच्या जोखिमेचा गोषवारा आणि त्यासंदर्भातील उपाययोजना याचे टिपण काढावे. हे करत असताना या बाबत एकवाक्यता होणे अपेक्षित आहे जेणेकरून अनुपालन कार्यप्रणाली लागू करताना येणाऱ्या आव्हानांबाबत सुयोग्य मार्ग काढणे सुकर होईल.

२. अनुपालन धोरणाचा मसुदा तयार करताना सक्षम आणि अनुभवी अधिकारी वर्गाची निवड करावी आणि त्यांद्वारे कच्चा मसुदा तयार करतानाच तो सर्वसमावेशक आहे का याची खातरजमा करून घ्यावी. जेणेकरून हा मसुदा संचालक मंडळाच्या बैठकीत मंजूर करून घेताना तो परिपूर्ण असेल. या धोरणामध्ये काही किमान महत्वाच्या बाबी अंतर्भूत करणे अपेक्षित आहे, जसे की अनुपालन विभागाचे मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवणे, कायदा आणि वैधानिक नियामक संदर्भातील अनुपालन केंद्रित कार्यपद्धती अनुसरणे, अनुपालन देखरेख आणि चाचणी पद्धत योजणे, विभागाचे अधिकार आणि मर्यादा, इत्यादी.

३. संचालक मंडळाने अनुपालनासंदर्भातील जोखीम, संस्थेस यायाबाबत आलेले अनुभव यांचा परामर्श घेऊनअनुपालन धोरणाचे वर्षातून किमान एकदा पुनरावलोकन करणे अपेक्षित आहे. हे पुनरावलोकन करत असताना संस्थेने अनुभवलेल्या यासंदर्भातील त्रुटी तसेच बँकिंग क्षेत्राशी निगडित अवगत झालेल्या त्रुटी या सर्व गोष्टींचा सर्वंकष विचार करावा.

४. मुख्य अनुपालन अधिकाऱ्याची निवड करताना बँकेच्या अधिकारवर्गातील अनुभवी सक्षम आणि स्वतंत्रपणे विचार आणि कृती

करण्याची क्षमता आणि इच्छा असणाऱ्या निष्कलंक व्यक्तीची निवड करावी. अशी निवड करताना अशा व्यक्तीचा पूर्वानुभव, सकारात्मक दृष्टिकोन तसेच सजगता याचा विचार करणे गरजेचे आहे. जर बँकेमध्ये अशी व्यक्ती न आढळल्यास अशा व्यक्तीला बाह्य स्रोतामधून बँकेमध्ये समाविष्ट करून घ्यावे. परिपत्रकातील मुख्य अनुपालन अधिकाऱ्याच्या नेमणुकीसंदर्भातील नियम हे अशा अधिकाऱ्याला स्वतंत्रपणे, कोणासही बांधील न राहता किमान कार्यकाळासाठी कार्य करता यावे याचा विचार करून केले आहेत याची संस्थेने नोंद घेऊन संस्थेसाठी या बाबत योग्य व्यक्तीची निवड करणे अपेक्षित आहे.

५. मुख्य अनुपालन अधिकाऱ्याला या पदासंदर्भातील अधिकार, जबाबदाऱ्या आणि अपेक्षा यांची जाणीव करून देणे तसेच याचा अंतर्भाव अनुपालन धोरणामध्ये करणे गरजेचे आहे. अशा व्यक्तीला योग्य ते अधिकार देण्याव्यतिरिक्त पुरेश्या प्रमाणात सक्षम अधिकारी वर्ग याकरीता उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

६. मुख्य अनुपालन अधिकाऱ्यावर असणाऱ्या परिपत्रकातील जबाबदाऱ्यांमधली नियामकाशी बँकेच्या वतीने संवाद साधण्याची तसेच गरजेनुसार थेट संवाद साधण्याची अपेक्षा या पदाचे गांभीर्य आणि अपेक्षा ठळकपणे दर्शवितात. याचप्रमाणे रिझर्व्ह बँकेच्या पाहणी अहवालाची पूर्तता करण्यासंदर्भातील संवाद अनुपालन विभागातर्फे होणे अपेक्षित आहे.

७. बँकेच्या प्रत्येक नवीन सेवांविषयी तसेच बदललेल्या कार्यपद्धती बाबत अनुपालन अधिकाऱ्याचे मत घेऊन अनुपालनाबाबतची जोखीम उद्भवणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

८. अनुपालन कार्यप्रणालीमध्ये बँकेसंदर्भातील विविध जोखीमांबाबत बँकेच्या विविध कार्यपद्धतीचा सापेक्षतः अभ्यास करून बँकनिगडित जोखीम कमी करण्यासाठीच्या सूचना वेळोवेळी करत रहाणे तसेच सजगपणे बँकेच्या विविध कार्यप्रणालीची तपासणी तसेच अनुलोकन अनियमित कालांतराने करून आढळणाऱ्या त्रुटी तसेच भविष्यात अशा त्रुटी राहू नयेत यासाठीची उपाययोजना वरिष्ठ व्यवस्थापनाच्या विचारार्थ मांडणे अपेक्षित आहे.

९. अनुपालन विभाग गरज भासल्यास वेळोवेळी बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना गरजेनुसार त्याचे शंकानिरसन करणे, वैधानिक तसेच नियामक तत्वांचे स्पष्टीकरण आणि त्यांचा अर्थ लावून समजून घेण्याकरिता उपलब्ध असेल अर्थात या विभागाने यासंदर्भातील नियम पारित करणे अपेक्षित नसून त्याची जबाबदारी बँकेच्या व्यवस्थापनाची आहे.

१०. अनुपालन विभागाचे नियमितपणे अंतर्गत लेखापरीक्षण होणे अपेक्षित असून या लेखापरीक्षणातून निरीक्षणांचे मुख्य अनुपालन अधिकाऱ्यास अवगत करणे अपेक्षित आहे ज्याद्वारे त्यास अनुपालनातील त्रुटी, उल्लंघन यांचा परामर्श घेणे आणि त्यावर सत्वर उपाययोजना करणे सोपे जाईल.

११. अनुपालन विभागातील अधिकारी वर्ग हा बँकेच्या नित्य व्यवहारांमध्ये तसेच नित्य व्यवहारामधील निर्णयप्रक्रियेमध्ये सहभागी न होणे अपेक्षित आहे जेणेकरून या विभागातील अधिकारी वर्ग हा स्वतंत्रपणे कार्य करू शकेलआणि कोणत्याही प्रकारे त्यांच्या कार्यामध्ये स्वारस्य संघर्ष उद्भवणार नाही.

बँकेने एक संस्था म्हणून अंतर्बाह्य सक्षम बनणे हे उद्दिष्ट ठेवून सकारात्मक भूमिकेतून खुल्या मनाने या अनुपालन प्रणालीचा अनुसार केला तर बँकेला दीर्घकालीन फायदा नक्कीच होत राहील.

**धनंजय ज. गोखले, सनदी लेखापाल, मुंबई**
(या लेखामधील मते ही लेखकाची वैयक्तिक मते असून त्यांस व्यावसायिक सल्ला म्हणून समजू नयेत)

**Tier 1 -** All unit UCBS and salary earner's UCBs (irrespective of deposit size), and all other UCBs having deposits up to 100 crore;
**Tier 2 -** UCBS with deposits more than 100 crore and up to 1000 crore;
**Tier 3 -** UCBS with deposits more than 1000 crore and up to 10,000 crore;
**Tier 4 -** UCBs with deposits more than 10,000 crore.



मा. श्री. अमर शिंदेसाहेब, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कोल्हापूर, यांची असोसिएशनला सदिच्छा भेट.



दि. २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी सायबर सिक्युरीटी या विषयावर इव्हेंटलिस्ट कॉन्फरन्स या कंपनीने आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रम शुभारंभ करताना असोसिएशनचे अध्यक्ष मा.निपुणराव कोरे.



असोसिएशनच्या वतीने सर्व सदस्य बँकासाठी सहकारी बँकाची सद्यस्थिती, आव्हाने आणि पुढील वाटचाल या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन करीत असताना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक मा. श्री. सतिशजी मराठे, असोसिएशनचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक तसेच आमदार मा. प्रकाश आवाडे.




दि. २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी सायबर सिक्युरीटी या विषयावर इव्हेंटलिस्ट कॉन्फरन्स या कंपनीने आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये चर्चा करत असताना असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.अनिल नागराळे, पंचगंगा बँक मुख्य कार्यकारी अधिकारी मा. दीपक फडणीस, पाटण अर्बन बँक मुख्य कार्यकारी अधिकारी मा.माधव कपिलेश्वर, बाबासाहेब देशमुख बँक मुख्य कार्यकारी अधिकारी मा. भगवंत पाटील-आडमुठे



रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या आलेल्या नवीन परिपत्रकावर दि. २५ व २६ ऑक्टोबर अशा दोन दिवसाच्या प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करीत असताना मा.धनंजय गोखले, चार्टर्ड अकौंटट, मुंबई.



रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या आलेल्या नवीन परिपत्रकावर दि. २५ व २६ ऑक्टोबर असे दोन दिवस प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये उपस्थित सदस्य बँकांचे अधिकारी.



दि. २० ऑक्टोबर २०२१ रोजी सर्फेसी ॲक्ट या विषयावर आयोजित केलेल्या प्रशिक्षणामध्ये मा. मोहन किर्निंगे मार्गदर्शन करीत असताना व समोर उपस्थित सदस्य बँकाचे प्रतिनिधी



कोल्हापूर बँक्स असोसिएशन व पुणे प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने Gold Valuation & Verification या विषयावर दि. २२ मे २०२२ रोजी प्रात्यक्षिक कार्यकाळा


**कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स्**
**सहकारी असोसिएशन लि.**

1458/ बी.जी.एन. चेंबर्स, कोळेकर तिकटी,
मंगळवार पेठ, कोल्हापूर-416 012
E-mail: kopbankasso@gmail.com
Website: kopbanksasso.com


बुक-पोस्ट

प्रति,
..............................................................
..............................................................
..............................................................
..............................................................

मुद्रक : मिरर प्रिंटींग प्रेस कोल्हापूर, ९४२३८५९०७६